# संपादकीय

'संत साहित्याची प्रासंगिकता' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या ई-नियतकालिक स्मरणिका प्रकाशित करताना आम्हांस अत्यंत आनंद होत आहे. महाराष्ट्र ही संतांची शुरांची, वीरांची भूमी म्हणून ओळखली जाते. एकूण भारतवर्षात संतांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. संत साहित्य सदा सर्वकाळ मानवतेची शिकवण देत आलेले आहेत. आधुनिक काळातही संतांचे विचार हे प्रासंगिक आहेत. सत्य, शिव व सुंदराची नित्य शिकवण संत साहित्याने दिलेली आहे.

महाराष्ट्र संत- कवि-परंपरा। तैसाचि चरित्रग्रंथाचा पसारा
वळणी लावावया समाज सारा। ग्रंथ लिहिले बहु तांनी

याप्रमाणे सर्व संतांच्या जीवनचरित्रावर, कार्यावर, उपदेशावर विचार मंथन व्हावे त्यासाठी श्री शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागाने प्रस्तुत 'संत साहित्याची प्रासंगिकता' या विषयाच्या अनुषंगाने विविध तज्ञ, मार्गदर्शक, प्राध्यापक, संशोधक यांचे संत साहित्यासंदर्भात शोधनिबंध मागवावे व संतांचे हे विचार ग्रंथरूपाने नव्या पिढीला द्यावेत हा मानस विभागाने ठेवला व प्रस्तुत ग्रंथ आकारास येत आहे. सर्वच संतांच्या कार्यांचा धांडोळा त्यांचे विचारधन प्रस्तुत ग्रंथातून आपणास वाचावयास भेटेल. संतांचे चरित्र, कार्य, विचार, उपदेश, अनुभव आज समाजासाठी, राष्ट्र विकासासाठी अत्यंत आवश्यक आहेत. त्यांच्या विचारधनाने संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य प्राप्त होऊ शकेल. अधिक कार्य करण्याची प्रेरणा मिळेल. सहकारी तत्त्व वाढीस लागेल. प्रांजळपणा विनयशीलता, अन्यायाला शांतपणे व योग्य रीतीने प्रतिकार करणे कर्तव्यनिष्ठा या गुणांचे संवर्धन होईल आणि हीच परंपरा आपण पुढील पिढीकडे द्याल अशी अपेक्षा या निमित्ताने आम्ही संपादक मंडळ व्यक्त करतो. आपण या विचारधनाचे स्वागत कराल! आपण दिलेला हा अनमोल ठेवा आपण अल्पावधीत केलेली ही ग्रंथसेवा त्याबद्दल आम्ही संपादक मंडळ सर्व शोधनिबंधकांचे अत्यंत आभारी आहोत. त्याचबरोबर या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी आणि ग्रंथासाठी आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा.आ. प्रकाशराव सोळंके, सरचिटणीस मा. आ. सतीश चव्हाण, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व सदस्य, तसेच मा. हेमंतराव जामकर सदस्य तथा महाविद्यालय विकास समिती प्रमुख व सर्व सन्माननीय सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशट्टी, उपप्राचार्य डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. उत्कर्ष किट्टेकर (गुणवत्ता हमी कक्ष) प्रबंधक श्री विजय मोरे, मराठी विभागातील प्रा. अनिल बडगुजर, प्रा. सारिका पासंगे, प्रा. अतुल समिंद्रे, प्रा. अंकुश खटिंग,प्रा. तेजस्विनी कपाटे महाविद्यालयातील प्राध्यापक व विभागातील पदवी-पदव्युत्तर विद्यार्थी यांच्या सहकार्यानेच आम्ही प्रस्तुत ग्रंथ साकार करू शकलो. हा ग्रंथ सर्वांकरिता उपलब्ध हवा म्हणून The South Asian academic Research chronicle peer-Reviewed International open access monthly e-Journal चे सल्लागार मंडळ यांचे आम्ही मनापासून आभारी आहोत. अक्षर जुळवणी करणारे श्री अनिल गरड यांचेही आभार मानतो.

डॉ.प्रल्हाद भोपे , डॉ.राजू बडुरे मराठी विभाग,
म. शि. प्र. मंडळाचे,
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

**संत तुकारामांच्या अभंगातील 'अनुभव' विचार**

**प्रा.सखाराम बाबाराव कदम,**